लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या दिवंगत सचिव तथा प्राचार्या शुभांगी गावडे यांच्या जयंतीनिमित्त संस्थेच्या विविध शाखांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी संबोधित केले.

# शुभांगी गावडे जयंती, विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या दिवंगत सचिव प्राचार्या शुभांगी मुरलीधर गावडे यांच्या ५४ व्या जयंतीनिमित्त संस्थेच्या विविध शाखांमध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. छायाचित्र प्रदर्शन, आरोग्य तपासणी शिबिर, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, साडी वाटप आणि महिला सक्षमीकरणाची शपथ अशा कार्यक्रमांद्वारे त्यांना अभिवादन करण्यात आले.

विवेकानंद कॉलेज येथे छायाचित्र प्रदर्शन, तसेच भारती विद्यापीठाच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर झाले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रद्धा जाधव, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. गीतांजली साळुंखे यांनी शुभांगी गावडे यांच्या नेतृत्वगुण आणि शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. डॉ. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे, डॉ. मृणालिनी देसाई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. कॉलेजच्या आवारात ५०० झाडे लावण्यात आली. न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलच्या वतीने साडी वाटप आणि शुभांगी गावडे यांच्या कार्यावर आधारित पोस्टर प्रदर्शनही झाले.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १ ऑगस्ट २०२६

# कलागुणांना बळ देणारे व्यासपीठ म्हणजेच युवा महोत्सव : डॉ. हुजरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युवा महोत्सव आणि 'इंद्रधनुष्य'सारखी व्यासपीठे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणार असल्याचे प्रतिपादन विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय एकदिवसीय युवा महोत्सव माहिती कार्यशाळा पार पडली. यावेळी ते बोलत होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. एस. जी. घाणे यांनी युवा महोत्सवाबद्दल माहिती दिली. डॉ. प्रमोद पाटील यांनी मार्गदर्शन केले. विविध कला प्रकारांवरील तज्ज्ञांनी मार्गदर्शन व प्रात्यक्षिके सादर केली. डॉ. आरिफ महात यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील व डॉ. मृणालिनी देसाई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.